सकाळ

# 'रवळनाथ'मुळे विश्वास सार्थ

## प्राणलिंग स्वामी; निपाणी शाखेचा वर्धापन उत्साहात



**निपाणी : योगेश गुप्ता यांचा सत्कार करताना प्राणलिंग स्वामी. शेजारी एम. एल. चौगुले, प्राचार्य हेरेकर, संचालक व इतर.**

निपाणी, ता. १८ : पारदर्शक व काटकसरी कारभारातून प्रगती केलेल्या श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने सभासद, कर्जदार, ग्राहकांचा विश्वास सार्थ ठरवला, असा गौरवोद्गार समाधी मठाचे मठाधीश प्राणलिंग स्वामी यांनी काढले. श्री रवळनाथच्या येथील शाखेच्या ५ व्या वर्धापननिमित्त ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

याप्रसंगी प्रवीणसिंह शिलेदार दापत्यांच्या हस्ते महापूजा झाली. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व संस्थेचे संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी संस्थेचा आढावा घेतला. एम. एल. चौगुले म्हणाले, 'बँकेपलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जोपासल्याने सर्वांनाच 'रवळनाथ' आपली वाटते.

याप्रसंगी निवृत्त सभासद पद्मावती रतुनावर, प्रा. धनाजी ढोकरे, पंच्याहत्तरी पूर्ण झालेले योगेश गुप्ता, पाल्य मधुरा पोवार, सानिका पावले, दिव्या पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. कार्यक्रमास संचालक महेश मजती, प्रा. डॉ. मनोहर पुजारी, संदीप कागवाडे, सल्लागार प्रा. डॉ. शिवाजी होडगे, प्राचार्य डॉ. एम. बी. कोथळे, विद्यावती जनवाडे, रश्मी व्हदडी, सुषमा शिलेदार, राजन व्हदडी, शाखाधिकारी उत्तम दळवींसह सभासद, कर्मचारी उपस्थित होते. शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर यांनी स्वागत केले. सल्लागार प्रा. डॉ. प्रवीणसिंह शिलेदार यांनी सूत्रसंचालन केले. वीरगौडा पाटील यांनी आभार मानले.

Belgaum, Nipani-Today
19/08/2022 Page No. 4